**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ९०/२०१९** **दिनांक ०८/११/२०१९** **कालावधी ५ दिवस**


| डॉ. प्रशांत बोडके, | डॉ. विजय मोरे, | डॉ. शितल यादव, |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०२/११/२०१९ ते ०८/११/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ०९/११/२०१९ सकाळी ८:३० पासून १३/११/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२/११ | ०३/११ | ०४/११ | ०५/११ | ०६/११ | ०७/११ | ०८/११ | | ०९/११ | १०/११ | ११/११ | १२/११ | १३/११ |
| ०.० | २.६ | ०.० | ९.६ | ०.० | ०.० | ०.० | **पाऊस (मिमी)** | ० | ० | ० | ० | ४ |
| ३२.२ | ३१.० | ३१.२ | ३१.४ | ३२.० | ३२.० | २९.८ | **कमाल तापमान (अं.से)** | ३१ | ३१ | ३१ | ३१ | ३१ |
| २०.५ | २०.० | २१.५ | २४.० | २२.५ | २२.५ | २१.० | **किमान तापमान (अं.से)** | २३ | २३ | २३ | २३ | २३ |
| ० | २ | ४ | ४ | ६ | ४ | ४ | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ४ | १ | ० | १ | १ |
| ८६ | ९१ | ९६ | ९५ | ९३ | ९६ | ८८ | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ९६ | ९३ | ९१ | ८३ | ८० |
| ९८ | ७१ | ६८ | ७३ | ७८ | ७१ | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ६८ | ६७ | ६६ | ६७ | ६८ |
| ३.८ | २.२ | १.८ | २.१ | १.६ | २.५ | ३.४ | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ४ | ४ | ६ | ६ | ७ |
| शांत | शांत | शांत | प. | प. | शांत | शांत | **वाऱ्याची दिशा** | इ.पू. | इ. | इ.पू. | इ.पू. | इ.पू. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| १२.२ | ५१३०.९ | ३०७१.८ |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक १३ नोव्हेंबर, २०१९ रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून आकाश निरभ्र राहील.**

**दिनांक ८ ते १४ नोव्हेंबर, २०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा कमी राहील. सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (NDVI) नुसार रत्नागिरी जिल्ह्यामध्ये वनस्पती निर्देशांक मध्यम स्वरूपाचा आणि प्रमाणित पर्जन्यमान निर्देशांक (SPI) नुसार सौम्य ओलावा स्थिती दर्शविण्यात आली आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **भात** | **पक्व अवस्था** | • पुढील पाचही दिवस पाऊसाची उघडीप राहण्याची शक्यता असल्याने तयार झालेल्या भात पिकाची कापणी व मळणी उरकून घ्यावी. |
| **नागली** | **पक्व अवस्था** | • पुढील पाचही दिवस पाऊसाची उघडीप राहण्याची शक्यता असल्याने तयार झालेल्या नागली पिकाची कापणी व मळणी उरकून घ्यावी. |
| **वाल/ कडवा वाल** | **पेरणी** | • खरीप भात कापणी नंतर जमिनीच्या अंगओल्यावर विनामशागत वाल/ कडवा वाल पिकाची पेरणी करण्यासाठी भात कापणीनंतर शेतातील तणांचे ग्लायफोसेट (५ मि. ली. प्रति लिटर पाण्यातून) या अनिवडक तणनाशकाचा वापर करून नियंत्रण करावे. त्यानंतर कोणतीही मशागत न करता टोकण पद्धतीने दोन ओळीत ३० X १५ से.मी. अंतर ठेवून वालाची पेरणी करावी. पेरणी करते वेळी बियाण्याशेजारी भोक करून त्यामध्ये दाणेदार मिश्रखत गुंठ्यास एक किलो या प्रमाणे द्यावेत.<br>• खरीप भात कापणी नंतर जमिनीची मशागत करून वाल पिकाची पेरणी करावयाची असल्यास जमिनी वाफसा स्थितीत आल्यावर नांगरट करून हेक्टरी ५ टन शेणखत किंवा कंपोस्टखत मिसळून जमीन समपातळीत आणून वाल बियाण्याची ३० ते ४५ किलो प्रति हेक्टरी प्रति हेक्टरी बियाणे टोकण पद्धतीने ३० x १५ से. मी. किंवा ३० x २० से. मी. किंवा ३० x ३० से. मी. अंतरावर करावी. पेरणीच्या वेळेस ५४० ग्रॅम युरिया आणि ३ कि.ग्रॅ सिंगल सुपर फॉस्फेट प्रती गुंठा ओळीमध्ये बियाण्याखाली साधारण ५ सें.मी. खोलीवर द्यावे. पेरणीनंतर हलके पाणी दयावे.<br>• पेरणीपूर्वी बियाण्यास थायरम ३ ग्रॅम प्रती किलो या बुरशीनाशकाची प्रक्रिया करावी व त्यानंतर एक किलो बियाण्यास २५ ग्रॅम या प्रमाणात रायझोबियम या जीवाणू संवर्धकाची प्रक्रिया पेरणीपूर्वी १ तास आधी व बुरशीनाशकानंतर करून बियाणे सावलीत सुकवावे. |
| **आंबा** | **पालवी** | • आंब्याच्या नवीन येणाऱ्या पालवीवर तुडतुडे, शेंडे पोखरणारी आणि मिजमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने पालवीचे किडींपासून संरक्षण करण्यासाठी लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. किंवा क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही २५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पाऊसाची उघडीप पाहून फवारणी करावी.<br>• पारंपारिक पध्दतीने लागवड केलेल्या आंबा बागेमध्ये जुन्या अनुत्पादित झाडांची मध्य फांदी छाटणी व इतर मध्यम फांद्यांची विरळणी करावी. खूप जुन्या आणि उंच झाडांची छाटणी बुंध्यापासून दोन तृतीयांश उंचीवर करावी व कमी वयाच्या आणि कमी उंचीच्या झाडांची छाटणी १२ ते १५ फुट उंचीवर करावी. छाटणी केलेल्या झाडांवर क्लोरोपायरीफॉस कीटकनाशक ५ मि. ली. प्रति लिटर पाणी या प्रमाणात संपूर्ण झाडावर फवारून झाड भिजवून घ्यावे तसेच कीटकनाशकाचे द्रावण छाटणी केलेल्या झाडांच्या मुळांमध्ये देखील ओतावे. त्यानंतर १ लिटर डांबराच्या द्रावणामध्ये ५ ग्रॅम बाविस्टीनची भुकटी मिसळून कापलेल्या फांद्यांच्या भागावर लावावे. छाटणी केल्यानंतर सुरुवातीच्या काळात झाडाला १० ते १५ |

| | | |
|---|---|---|
| | | दिवसांच्या अंतराने १५० ते २०० लिटर पाणी द्यावे. नवीन फुटवे आल्यानंतर दोन आठवड्यांनी ३ ते ५ फुटवे ठेवून नवीन फुटव्यांची विरळणी करावी. पहिली विरळणी केल्यानंतर, छाटणी केलेल्या भागापासून खाली फुटवे येण्यास सुरवात झाल्यावर दर एक फुटावर एक याप्रमाणे खोडाच्या सर्व बाजूला फुटवे ठेवून इतर फुटवे काढून टाकावेत.<br>• घन लागवड (५ x ५ मी. किंवा ६ x ४ मी.) असलेल्या आंबा बागांमध्ये खूप जुन्या आणि उंच झाडांची सुरुवातीच्या काळापासून नियमित छाटणी करावी. या मध्ये उंची कमी करणे, फांद्या एकमेकांमध्ये गेल्या असल्यास छाटणे आणि वाळलेल्या फांद्या काढून टाकणे या गोष्टींचा अंतर्भाव करावा. घन लागवड असलेल्या बागांमधील कलमांची उंची दोन ओळींच्या अंतराच्या ८०% इतकी ठेवावी. |
| **काजू** | **पालवी** | • काजूच्या नवीन येणाऱ्या पालवीवर ढेकण्या व फुलकिडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने पालवीचे किडींपासून संरक्षण करण्यासाठी नवीन पालवी फुटण्याच्या वेळी मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के प्रवाही १५ मि.ली. किंवा लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पाऊसाची उघडीप असताना फवारणी करावी. |
| **भाजीपाला रोपवाटिका** | **रोप अवस्था** | • रब्बी भाजीपाला रोपवाटीकेतील रोपांच्या जोमदार वाढीसाठी पेरणीनंतर १५ दिवसांनी प्रत्येक वाफ्यास ५० ग्रॅम युरियाची मात्रा द्यावी.<br>• भाजीपाला रोपवाटीकेतील पिकावर पाने खाणारी अळी, पांढरी माशी, तुडतुडे, मावा इ. किडींचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी डायमिथोएट १५ मिली प्रति १० लि. पाण्यात मिसळून १० ते १५ दिवसाच्या अंतराने फवारणी करावी.<br>• भाजीपाला तसेच फळबाग रोपवाटीकेस नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.**<br>**• अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा** | | |